# विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय

## बचतधाम समिती
## अल्प मुदतीची जाहीर सूचना

या कार्यालयाच्या अधिनस्त असणाऱ्या सेक्टर १०, सीबीडी बेलापूर येथील बचतधाम विश्रामगृहातील सोलापूरी चादर, बेडशिट, पिलो कव्हर, टॉवेल, नॅपकिन, ब्लँकेट इत्यादी साहित्यांची धुलाई व ईस्त्री करणे आवश्यक आहे.

सदरहू साहित्य धुलाई काम करणाऱ्या इच्छुक एजन्सीधारकांकडून दि.१४.०३.२०२२ पर्यंत दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची अधिक माहिती, अर्जाचा नमुना, इत्यादी (www.http://divcomkonkan.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/-XXX
सदस्य, बचतधाम विश्रामगृह समिती
तथा उप आयुक्त(सामान्य प्रशासन)
कोकण विभाग

साशा/इमारत/कक्ष-१/बचतधाम-साहित्य धुलाई/२०२२
दिनांक :०३.०३.२०२२
(संपर्क क्र.०२२-२७५७१५०१)

Scanned with CamScanner

**सीबीडी बेलापूर येथील बचतधाम विश्रामगृहातील कापडी साहित्याची धुलाई व ईस्त्री करणेबाबत.**

## दरपत्रक संदर्भात नियम व अटी

| अ.क्र. | नियम व अटी |
|---|---|
| १ | मोहोरबंद पाकीटात दरपत्रक समक्ष दिनांक ०४.०३.२०२२ ते दिनांक १४.०३.२०२२ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी या कार्यालयातील इमारत कक्ष, पहिला मजला, कोंकण भवन येथे जमा करावीत. त्यावर * **सीबीडी बेलापूर येथील बचतधाम विश्रामगृहातील कापडी साहित्याची धुलाई व ईस्त्री करणेबाबत** * असा स्पष्ट उल्लेख असावा. सदर दरपत्रक दिनांक १५.०३.२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता उघडण्यात येईल. दरपत्रक उघडण्याच्या वेळी दरपत्रकधारक यांना हजर राहता येईल. |
| २ | दरपत्रक कागदपत्रात कोठेही खाडाखोड, Overwriting, पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पुर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार बचतधाम समितीने राखून ठेवले आहेत. |
| ३ | सदर करार हा सुरवातीस दिनांक ०१.०४.२०२२ ते ३१.०३.२०२३ या कालावधीकरीता देय असेल. |
| ४ | बचतधाम विश्रामगृह येथील सोलापूरी चादर, बेडशिट, पिलो कव्हर, टॉवेल, नॅपकिन, ब्लँकेट इत्यादी साहित्य धुलाईसाठी या कार्यालयाच्या निर्देशानुसार घेऊन जाणे व व्यवस्थित धुऊन / ईस्त्री करुन बचतधाम व्यवस्थापक यांस मोजून परत करणे बंधनकारक राहील. |
| ५ | बचतधाम विश्रामगृह येथील सोलापूरी चादर, बेडशिट, पिलो कव्हर, टॉवेल, नॅपकिन, ब्लँकेट इत्यादी साहित्यांची वेळेत धुलाई तसेच ईस्त्री करणे बंधनकारक राहील. |
| ६ | बचतधाम विश्रामगृह येथील धुलाईसाठी घेऊन गेलेले साहित्य गहाळ झाल्यास सदरहू साहित्य किंवा त्यांची होणारी किंमत दरपत्रकधारकाने या कार्यालयाकडे जमा करणे बंधनकारक राहील. |
| ७ | बचतधाम विश्रामगृह येथील साहित्याच्या धुलाईसाठी लागणारी साधन सामग्री बचतधाम समितीकडून पुरविण्यात येणार नाही. |
| ८ | दरपत्रकधारकाकडून धुलाई करण्यात येणारे साहित्य व्यवस्थितरित्या धुऊन निघाल्याची खात्री पटल्याशिवाय त्याबाबतचे देयक अदा केले जाणार नाही. |
| ९ | बचतधाम विश्रामगृह समितीकडून धुलाई साहित्याचा व वाहतूकीचा खर्च अदा केला जाणार नाही. |
| १० | सदरहू धुलाई करण्यात आलेल्या साहित्याचा पुरवठा करण्यात आल्यानंतर केलेल्या कामाचे देयक या कार्यालयास सादर केल्यानंतर आपणांस देय असणारी रक्कम धनादेशाद्वारे आपणांस अदा करण्यात येईल. |
| ११ | दरपत्रकधारकाने बचतधाम विश्रामगृहातील साहित्य व्यवस्थित रित्या धुऊन व ईस्त्री करुन देण्याची सेवा समाधानकारकरित्या केली नाही तर सदरहू करार कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्यात येईल. |
| १२ | दरपत्रकधारकास धुलाई ठेका प्रदान केल्यानंतर सुरक्षा अनामत रक्कम रुपये २०००/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट (डी. डी.) ***बचतधाम समिती कोंकण भवन*** या नावाने काढून या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. |
| १३ | दरपत्रकधारकास वरील सर्व नियम व अटी मान्य असल्यास त्यांनी याबाबत रुपये १००/- च्या बॉन्ड पेपरवर लेखी करारनामा करुन या कार्यालयास सादर करावा. |
| १४ | कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रक किंवा सर्व दरपत्रके फेटाळण्याचा अधिकार बचतधाम विश्रामगृह समितीस राहतील. |

सही/-xxx

**(मनोज रानडे)**

**सदस्य, बचतधाम विश्रामगृह समिती तथा**

**उप आयुक्त(सामान्य प्रशासन)**

**कोकण विभाग**

Scanned with CamScanner

# अर्ज नमुना

दिनांक :-

प्रति,
मा.अध्यक्ष,
बचतधाम समिती तथा
विभागीय आयुक्त, कोंकण विभाग,
कोंकण भवन, नवी मुंबई - ४०० ६१४

विषय :- सीबीडी बेलापूर येथील बचतधाम विश्रामगृहातील कापडी साहित्याची धुलाई व ईस्त्री करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन, बचमधाम समिती सदस्य तथा उप आयुक्त(सामान्य प्रशासन), कोकण विभाग यांनी आपले कार्यालयाच्या संकेतस्थळावर बचतधाम विश्रामगृह येथील कापडी साहित्याची धुलाई व ईस्त्री करणेबाबतची जाहीर सूचना क्रमांक साशा/कक्ष-१/इमारत/बचतधाम-साहित्य धुलाई/२०२२ दि.०३.०३.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्याबाबतचे दरपत्रक सोबत जोडले आहे.

मी सदर दरपत्रकाबाबतच्या सर्व नियम व अटी मान्य करतो.

| अ.क्र. | आवश्यक माहिती | तपशील |
|---|---|---|
| १ | दरपत्रकधारकाचे पूर्ण नाव | |
| २ | मोबाईल क्रमांक | |
| ३ | ई-मेल आयडी | |
| ४ | दरपत्रकधारक एजन्सीचा संपूर्ण पोष्टाचा पत्ता | |
| ५ | वस्तु व सेवा कर (GST) नोंदणी क्रमांक | |
| ६ | आधारकार्ड क्रमांक (सोबत प्रत जोडावी) | |
| ७ | पॅनकार्ड क्रमांक (सोबत प्रत जोडावी) | |

आपला विश्वासू,

(दरपत्रकधारकाचे नाव व स्वाक्षरी)

Scanned with CamScanner

**सीबीडी बेलापूर येथील बचतधाम विश्रामगृहातील**
**कापडी साहित्याची धुलाई व ईस्त्री करणेबाबत.**

## RATE QUOTATION

| S. N. | ITEM NAME | RATE PER PIECE (in Rupees) |
|---|---|---|
| 1 | Bombay Dyeing white bedsheets (Single) | |
| 2 | Bombay Dyeing white bedsheets (Double) | |
| 3 | Bombay Dyeing Printed bedsheets | |
| 4 | Bombay Dyeing white turkish towel | |
| 5 | Bombay Dyeing Printed turkish towel | |
| 6 | Bombay Dyeing white napkins big size | |
| 7 | Bombay Dyeing white napkins small size | |
| 8 | Blankets (Single) | |
| 9 | Blankets (Double) | |
| 10 | Pillow Cover | |
| 11 | Solapuri Chaddar | |
| 12 | OTHERS | |

Scanned with CamScanner